**नियमीत फौजदारी खटला क्र. २३५/२०२२**
**शासन वि. हासीम**
**नि.क्र. ३९**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा शपथेवर पुरावा</u>**

**नाव –** शेख जावेद शेख बन्नुपटेल

**वय –** २५ वर्षे, **व्यवसाय –** शेती

**रा. –** नंदपुर, ता. गेवराई, जि.बीड

**<u>सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. बी. एस. नाकाडे यांचेद्वारा,</u>**

मी चारही आरोपींना ओळखतो. घटना ही दि. ०५.०५.२०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वाजताच्या सुमारास खेर्डा बु. शिवारात रुमना नावाच्या शेतात घडली होती. त्यावेळी त्या शेतात मी व माझी आई हजर होतो. तेव्हा तेथे माझा चुलत भाऊ शेख कलीम शेख नयुम तेथे आला. तेव्हा मी त्याला सामाईक बांधावर दगड का टाकतो असे म्हटले. तेव्हा त्याने मला "तुम्ही लई माजले, तुमच्याकडे बघावे लागते" असे म्हणुन शिवीगाळ केली व फोन करुन वडील व भावाला बोलावुन घेतले. ते आल्यानंतर शेख हसीम शेख नयुम याने दगडाने माझे डोक्यात मारले. त्यामुळे माझे डोक्यात जखम झाली. तसेच शेख कलीम याने माझे नाकावर दगड मारुन मला जखमी केले. शेख अलीम नयुम याने माझ्या डाव्या हाताच्या खांद्याच्या खाली दंडावर कत्ती मारली. त्यामुळे माझ्या दंडावर जखम झाली. तसेच शेख नयुम शेख गुलाब याने शिवीगाळ करुन मला लाथाबुक्क्यांनी

मारहाण केली. शेख हसीम शेख कलीम याने मला, “तुम्ही लई माजलात, तुमच्याकडे बघावे लागते” असे म्हणुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तेथुन थोड्याच अंतरावर माझी आई होती. माझा आरडा ओरडा ऐकुण माझी आई तेथे आली व माझी सोडवणुक केली. त्यानंतर माझा भाऊ शेख नवीद हा त्यावेळी गावात होता. त्याला आरडा ओरडा झाल्याने माहिती झाल्याने तो घटनास्थळावर आला. त्याने मला खाजगी वाहनाने गेवराई येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी आणले. गेवराई येथे उपचार करुन मला बीड येथील सरकारी दवाखान्यात पाठवले व तेथे वार्ड क्र. ६ मध्ये उपचारासाठी भरती केले. दि. ०७.०५.२०२२ रोजी मी दवाखान्यात असताना पोलीस कर्मचारी कुव्हारे यांनी डॉक्टरांसमक्ष माझा जबाब सकाळी ११.३० च्या सुमारास घेतला होता. माझ्या जबाबातील मजकुर पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेवुन मला वाचुन दाखवला होता व त्यावर मी सही केली होती. आता मला तो जबाब दाखवला. त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करिता सदर जबाबाला **निशाणी क्र. पी.१/पी.डब्लु.१** देण्यात येतो. शेख अलीम याने मला ज्या कत्तीने मारले ती अंदाजे दिड फुट लांबीची होती. मी ती कत्ती पाहिल्यास ओळखु शकतो. आता मला मुद्देमाल क्र. २१/२०२३ वरील कत्ती दाखवली. आरोपी अलीम याने मला ज्या कत्तीने मारहाण केली ती हीच कत्ती आहे. करिता सदर कत्तीला भौतिक वस्तु क्र. अ देण्यात येतो. मला मारहाण करणारे तीनही आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>आरोपी हजर, आरोपीचे वकील हजर</u>**

आरोपीच्या वकीलांनी उलटतपासासाठी वेळ मिळण्याचा दिलेला अर्ज नामंजुर झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ अंतर्गत उलटतपास बंद करण्यास सबळ कारण असल्याने उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE
Date: 2024.05.17 10:55:53 +0530

स्थळ : गेवराई. }{ ( एस. पी. वानखडे )
दिनांक : १६ मे,२०२४ }{ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तथा
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गेवराई